# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 422/2022 दिनांक : 04.11.2022**

## 1)घरफोडी :–

**1)उस्माननगर :–** दिनांक 03.11.2022 रोजी 01.30 ते 03.00 वा. चे दरम्यान, **फर्यादीचे राहातेघरी मौ. लाट खुर्द ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे वडीलांची तब्येत खराब झाल्याने घराला कुलूप लावुन उपचार कामी पुणे येथे गेले असतांना व घरी कोणीही नसतांना कोणीतरी अज्ञात आरोपीतांनी फिर्यादीचे राहाते घराचे कुलूप तोडुन आत प्रवेश करून आतील कपाट व पेटीचे कुलूप तोडुन कपाटात व पेटीमध्ये ठेवलेले चांदीचे भांडे वजन 700 ग्रॅम जुने वापरते किंमती 20,000/–रूपयाचे व सोन्याचे दागीने तसेच साक्षीदारांचे घरातुन नगदी 13,000/–रूपये असा एकुण 68,000/–रूपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी प्रदीप लिंगोजी इंगोले, वय 53 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. लाठ खुर्द ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरन 182/2022 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/127 मुंडे, मो.क्रं. 9421390003** हे करीत आहेत.

## 2)जनावर चोरी :–

**माळाकोळी :–**दिनांक 01.11.2022 रोजी चे 19.00 ते दि. 02.11.2022 चे 05.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे शेतातील आखाडयावर वाहद शिवार ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे तीन गाबण म्हशी किंमती 1,50,000/–रुपयाच्या कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरुन नेल्या. वगैरे **फिर्यादी रावसाहेब व्यंकटी मुकणर, वय 52 वर्षे, व्यवसाय शेती रा. वाहाद ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे माळाकोळी** गुरनं 109/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2504 कदम, मो. क्र. 8652147575** हे करीत आहेत.

## 3)मो. सा. चोरी :–

**1)विमानतळ :–** दिनांक 27.10.2022 रोजी 22.00 ते दि. 28.10.2022 चे 06.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घराचे गेट समोरून ताहेर कॉलनी जय मल्हार चौक बायपास नांदेड येथे,** यातील फिर्यादीची मो सा क्रं एमएच–21/एझेड–987 किंमती 35,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी शेख इर्शाद शेख रज्जाक, वय 32 वर्षे, व्यावसायीक मेकॅनिक रा. ताहेर कॉलनी जयमल्हार चौक बायपास नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 382/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2735 खंदारे, मो.क्रं. 8551059899** हे करीत आहेत.

**2)देगलुर :–** दिनांक 29.10.2022 रोजी 22.30 ते दि. 30.10.2022 चे 01.30 वा. चे दरम्यान, **साळवण हनुमान मंदीर देगलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो कंपणीची मो सा क्रं एचफ डिलक्स काळया रंगाची टीएस–16/ईई–8231 किंमती 25,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी गंगाधर विठठलराव सुगावे, वय 50 वर्षे, व्यवसाय नौकरी लाईनगल्ली देगाव रोड ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरन 505/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/मिरदोडे, मो.क्रं. 9821159844** हे करीत आहेत.

## 4)विवाहीतेचा छळ :–

**1)किनवट :–** दिनांक 01.06.2020 ते 03.06.2021 चे दरम्यान, **फिर्यादीचे ससरी रेल्वेस्टेशन जवळ ईस्लापुर व माहेरी जयभिमनगर बोधडी बु. ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझे नवऱ्याचे उपचारासाठी माहेरहुन 50,000/–रूपये घेवुन ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून शारिरिक व मानसिक छळ करून माहेरी हाकलुन दिली. वगैरे **फिर्यादी 23 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 210/2022 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1805 पांढरे, मो.क्रं. 9422242568** हे करीत आहेत.

## 5)शासकीय कामात अडथळा :—

**कंधार :—**दि. 03.11.2022 रोजी 10.30 वा. चे सुमारास, **मौ. गोणार ता. कंधार जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादी व त्याच्या सोबतचे अधिकारी आणि कर्मचारी महाराष्ट्र राज्य महावितरण विद्युत कंपणी शाखा पेठवडज यांनी वरिष्ठांचे आदेशानुसार वीज चोरी शोध मोहीम, विज बिल वसुली व मीटर पाहणी करण्यासाठी गेले असता व आरोपीचे घरगुती मिटरची पाहणी करीत असतांना मीटर जवळील विद्युत पोल वरून येणारे वायर तोडुन उघडा केल्याचे दिसत असल्याने ते पाहात असतांना यातील नमुद आरोपीने फिर्यादीस मिटरचे वायर का बघता असे म्हणुन शिवीगाळ करून फिर्यादीस थापड बुक्यानी मारहाण करून हकलुन दिल्याने फिर्यादी खाली पडल्यने त्याचे डोक्याचे पाठीमागे मुक्का मार लागला. व शासकीय कामात अडथळा निर्माण केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी समाधान गोविंद इंगळे, वय 42 वर्षे, व्यवसाय कंत्राटी कर्मचारी महाराष्ट्र राज्य महावितरण विद्युत कंपणी रा. पेठवडज ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 332/2022 कलम 353, 504, 206 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री इंद्राळे, मो.क. 9975754256** हे करीत आहेत.

## 6)भारतीय हत्यार कायदा :—

**1)मरखेल :—** दिनांक 03.11.2022 रोजी 15.45 वा. चे सुमारास, **मरखेल ते हाणेगाव जाणारे रोडवर अण्णा भाऊ साठे पुतळया समोर मरखेल देगलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदशिररीत्या चोरटी विक्री करण्याचे उद्येशाने 128 तलवारी व 23 खंजीर किंमती 1,39,000/—रूपयाचा माल वाहतुक करीत असतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोनि/श्री विष्णुकांत तुकाराम गुटटे, ने. पोस्टे मरखेल** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 234/2022 कलम 4/25, 7/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री जायभाये, मो.क्र. 8830564618** हे करीत आहेत.

## 7)विषारी साप चावुन मृत्यु :—

**किनवट :—**दिनांक 03.11.2022 रोजी चे 08.00 ते 08.30 वा. चे दरम्यान, **मयताचे शेतात मौ. निचपुर ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे मनोहर रामचंद्र केंद्रे, वय 55 वर्षे, व्यवसाय शेती रा. निचपुर ता. किनवट जि. नांदेड**, हा त्यांचे शेतात सोयाबीन गंजीची पलटी करण्यासाठी गेला असता सर्पदंश झाल्याने मरण पावला आहे. वगैरे **खबर देणार बालाजी उत्तमराव केंद्रे, वय 40 वर्षे, व्यवसाय शेती रा. निचपुर ता. किनवट जि. नांदेड,** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे किनवट** आ. मृ. 39/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1913 राठोड, मो.नं. 9767868500** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड